# कोट्यवधींच्या गायरान जमिनी खासगी कंपन्यांच्या घशात घालणं थांबवा, दलितांना बेदखल करु नका ?


अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ

सायं.दैनिक महाराष्ट्र

**आरंभ**

संपादक : दिपक थोरात Mob.9860898564

■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष – ०२ ■ अंक – २०५ ■ रविवार दि.१३ एप्रिल २०२५ ■ आरएनआय – एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रू. । पाने ४

■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 205 ■ Sunday Dt.13 April 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4




# वाल्मिक कराडसोबत जवळगाव येथील गायरान जमिनीसंदर्भात मोठी डील?

## जवळगावच्या गायरान जमिनी संदर्भात आजी-माजी पालकमंत्री आमदार, खासदारांना कंपनीकडून आर्थिक तडजोड? खा.बजरंग सोनवणे, ना.पंकजा मुंडे, आ.धनंजय मुंडे, आ.नमिता मुंदडा मुंग गिळून गप्प का? यांची भूमिका अस्पष्ट?

## परळी मतदारसंघामध्ये जवळगावसह अनेक ठिकाणी ना.पंकजा मुंडे व आ.धनंजय मुंडेंकडून गायरन धारकांवर अन्याय?

## अंबाजोगाई महसूल तहसीलदार विभाग म्हणते की, आमच्याकडे त्या जमिनीचा हस्तांतर करण्याच्या कुठल्याही हालचाली नाहीत

## पोलिस प्रशासनाला कुठलेही पत्र दिलेले नाहीत मग पोलीस प्रशासन नेमकं जवळगाव येथील गायरान धारकांना उठवण्याचा प्रयत्न कोणाच्या इशारावरुन करत आहेत

## आ.नमिता मुंदडांच्या मतदारसंघामध्ये येत नसेल तर आपण अंबाजोगाई तालुक्यातील गायरानधारकांच्या पाठीशी उभे राहणे गरजेचे?

बीड । प्रतिनिधी

सौर ऊर्जा पॅनल बसवण्यासाठी महाराष्ट्रातील अनेक ठिकाणी खासगी कंपन्यांना गावानजीकची गायराने अत्यल्प मोबदल्यात बहाल केली जात आहेत. राज्यभर अनेक ठिकाणी ही गायराने दलित समाजाच्या ताब्यात आहेत. अत्यंत गरीब अवस्थेत जीवन जगणाऱ्या दलित समाजाच्या कुड, पाचट, पत्राच्या गायरानातील घरांवर बुलडोझर फिरवले जात आहेत. पोलीस बळाचा वापर करून ताबा असलेल्या दलित कुटुंबांना गायरानांवरून हुसकावले जात आहे. परंतु यावर बोलायला कोणीही तयार नाही.

### केज मतदारसंघाचे नेतृत्व केलेले माजी आ.पृथ्वीराज साठे हे मात्र मूग गिळून गप्प का?



बीड जिल्ह्यामध्ये अनेक ठिकाणी दलित समाजाचे गायरान हे शासन वेगवेगळे योजनासाठी राबवत आहे. व गुत्तेदारांच्या घशामध्ये जात आहे. गोरगरिबांच्या गेल्या ५० ते ६० वर्षापासून कसत असलेल्या जमिनी शासन परत घेण्याचा प्रयत्न करत आहेत. तर अंबाजोगाई केज मतदार संघामध्ये असाच काही प्रकार घडलेला आहे. जवळगाव येथील गायनधारकांना पोलिसांनी वयोवृद्ध महिला उचलून नेताणचा फोटो व्हिडिओ व्हायरल झाले आहे. गायरान धारक हे येऊन जिल्हाधिकारी यांना भेटलेले आहेत. त्या ठिकाणी मात्र केज मतदार संघाचे नेतृत्व केलेले माजी आमदार पृथ्वीराज साठे हे मात्र मूग गिळून गप्प का आहेत. तर यावेळी मात्र खा.बजरंग सोनवणे, ना. पंकजा मुंडे, आ. धनंजय मुंडे, आ.नमिता मुंदडा हे संबंधित कंपनी सोबत राजकीय तळजळीमध्ये आर्थिक व्यवहार झाल्याची चर्चा असताना यामध्ये मातंग समाजाचे आमदार असलेले पृथ्वीराज साठे यांनी दलित समाजासाठी आवाज उठवणे बंधनकारक आहे का नाही असा प्रश्न आता जनतेला पडलेला आहे. कारण यावेळी पृथ्वीराज साठे आहेत, असा सवाल आता मागासवर्गीय समाजातून होत आहे.

आ.धनंजय मुंडे, मंत्री पंकजा मुंडे, खासदार बजरंग सोनवणे, आमदार नमिता मुंदडा यांना दलितांची मते चालतात दलितांचे हक्क चालत नाहीत. त्यामुळे बीड जिल्ह्यामध्ये अनेक ठिकाणी गायरान धारकांच्या जमिनी शासनाकडून वेगवेगळ्या कंपनीच्या घशामध्ये घालण्यासाठी वाल्मीक कराड सारख्या लोकांच्या डोळ्यांमध्ये जन्म घेत आहेत. तर परळी मतदारसंघातील जवळगाव व अंबाजोगाई तालुक्यात येत असल्यामुळे ही डील खासदार बजरंग सोनवणे, मंत्री पंकजा मुंडे, आमदार धनंजय मुंडे, आमदार नमिता मुंदडा व वाल्मीक कराड यांना विचारूनच झाल्याची चर्चा सध्या बीड जिल्ह्यामध्ये आहे. कारण दोन ते तीन दिवसांपूर्वी गेल्या ७० ते ८० दिवसांपासून गायरान जमिनी वाचविण्यासाठी अंबाजोगाई तालुक्यातील जवळगाव सह अन्य गावांमध्ये गायरान धारक आंदोलन करत आहेत. परंतु त्या ठिकाणी पोलिसांना पैसे देऊन संबंधित कंपनी ही गायरान धारकांना त्या गायरानातून उचलून घेऊन जाताना चा एका वया वृद्ध महिलेचा फोटो आणि व्हिडिओ व्हायरल होत आहे. महिला पोलीस कर्मचारी एका वयोवृद्ध महिलेला उचलून घेऊन जात आहे तर अरेरावीची भाषा

पान २ वर



### पोलीस संरक्षणामध्ये दलित कुटुंबांच्या घरांवर जेसीपी

बीड जिल्ह्यातील घाटनांदूर, उजणी, बर्दापुर, बाभळगाव, जवळगाव, उंदरी, उमराई, केंद्रेवाडी, कोळपिंपरी गावांमध्ये अशा प्रकारची कारवाई खासगी सौर ऊर्जा कंपन्यांच्या भल्यासाठी पोलिसांच्या मदतीने व सरकारच्या पाठिंब्याने करण्यात आली आहे. पोलिसांच्या या अमानुष कारवाईचा प्रतिकार करण्यासाठी बीड जिल्ह्यातील आंबेजोगाई जवळील जवळगाव येथे दलित कुटुंबांनी आंदोलन सुरू केले. आपल्या पाचट, पत्रा, कुडाच्या झोपड्या वाचवण्यासाठी व कसत असलेली जमीन वाचावी यासाठी गेले सलग दीड महिना धरणे आंदोलन केले. हे आंदोलन मोडीत काढण्यासाठी कंपनीच्या अधिकाऱ्यांनी पोलीस संरक्षणामध्ये दलित कुटुंबांच्या घरांवर जेसीपी चालवत अमानुष अत्याचार केला. आपला प्रतिकार मोडून काढला जात आहे हे लक्षात घेत हतबल होऊन यातील तीन आंदोलकांनी विष प्राशन केले. हे तीन आंदोलक अत्यावस्थ असून आंबेजोगाई येथील हॉस्पिटलमध्ये ॲडमिट करण्यात आले होते.









### कोट्यवधी रुपयांच्या गायरान जमिनीची मालमत्ता खासगी कंपन्यांच्या घशात घालणे थांबवा

सौर ऊर्जा पॅनल उभारणीच्या निमित्ताने राज्यभरातील कोट्यवधी रुपयांच्या गायरान जमिनीची मालमत्ता खासगी कंपन्यांच्या घशात घालणे तातडीने थांबवा. कसत असलेल्या गायरान जमिनी कसणाऱ्यांच्या नावे करा. गायरानात घर बांधलेल्या घरांच्या तळजमिनी घर बांधणाऱ्यांच्या नावे करा. बीड जिल्ह्यात गरीब श्रमिकांना गायरानांवरून बेदखल करणाऱ्या कंपनीवर व त्यांना पोलीस संरक्षण देणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करा अशी मागणी बीड जिल्ह्यातील नागरिकांकडून होत आहे.

### बीड जिल्ह्यातील अनेक दलित संघटना आक्रमक, जवळबन येथील गायनधारकांवर अन्याय विरोधात दलित संघटनांनी उठवला आवाज

### गायराण धारकांचा प्रश्न मार्गी पोलिसांवर गुन्हे दाखल होणार? गायरानावर कंपनी ताबा करणार नाही– जिल्हाधिकारी बीड

जवळगाव या.अंबेजोगाई येथील गायरान धारक शेतकऱ्यांना पोलीस प्रशासनाने केलेल्या मारहाणीच्या विरोधात आज जिल्हाधिकारी बीड यांची भेट घेतली महावितरण मार्फत सोलर प्लांट गायरानावर उभा करण्याच्या संदर्भात निर्णय मागे घेण्यात यावा तसेच संबंधित कंपनी मालकावर सुद्धा गुन्हा दाखल करण्यात यावा असे जिल्हाधिकाऱ्यांना दलित संघटनांनी लेखी निवेदनाद्वारे कळविण्यात आले गायरानधारकांच्या कुठल्याही जमिनीला हात लावणार नाहीत असे आश्वासन जिल्हाधिकारी यांनी दिले.

# डॉ. आंबेडकर....!

## आमच्या रक्ताने जरी धुतले तुमचे पाय...
## तरी तुमचे उपकार फिटणार नाय...




डॉ. आंबेडकर तुम्ही जन्माला आलात आणि इथल्या शोषित, वंचित, गाव कुसाबाहेरच्या समाजाचे ५००० हजार वर्ष्याच्या गुलामीचे साखळदंड तुटले. तुमच्या मुळेच आमचे अस्तित्व आहे, कुठे तो सावलीचा विटाळ, आणि आज तो विमानाचा प्रवास, कुठे तो उष्टा घास आणि आजचे ते पंचपकवानाचे जेवण. डॉ. आंबेडकर आज आम्ही जे काही सुख उपभोगतोय ते सर्व तुमचेच उपकार आहेत, आमचं शिक्षण, नौकरी, व्यावसाय, जे काही आहे तुमचीच देणं आहे. आज आम्ही सुटबुटात वावरतोय, मोठ मोठ्या महागड्या गाड्यात फिरतोय, अंगावर किलोवर सोनं घालून फिरतोय, डॉ.आंबेडकर आमची आज जी काही मोठ मोठाले बंगले, प्रॉपर्टी आहे हि सगळी तुमचीच देणं आहे. डॉ. आंबेडकर तुम्ही वर्गाच्या बाहेर बसून शिकलात, पण आज तुमच्यामुळे हजारो अधिकारी प्रत्येक खात्यात मोठ्या थाटात नौकरी करत आहेत.

शेवटी एकच सांगेन.. बाभीमा....! आमचं जे काही आहे, ते सगळं तुमचंच देणं आहे. आज समाजाने खुप काही मिलवलं आहे, धन दौलत, वैभव, डॉ.आंबेडकर पूर्वी पायी चालण्याची भीती होती, पण आज रोज समाज विमानात फिरतोय हे सर्वकही शक्य झालंय ते फक्त आणि फक्त तुमच्या मुळेच. डॉ. आंबेडकर तुम्ही या पृथ्वी तलावा वरील प्रत्येक सजीव आणि निर्जीव वस्तूला संविधानात कवच कुंडल रुपी संरक्षण दिलंय, आज एखाद्या निर्जीव वस्तूला पण न्याय मागण्याचा अधिकार तुम्ही दिलात. ज्या समाजाला जणांवरापेक्षाही वाईट वागणूक होती आज तो समाज जन्मापासून ते मृत्यू पर्यंत वाटेल ते खाणे हवे तसे राहणे हि सर्व सुख तुमच्यामुळेच उपभोगतोय.

डॉ. आंबेडकर तुम्ही स्वतःची सोन्या सारखी मुलं आमच्या उद्धरासाठी दूर केलीत, एवढं तर आमच्यासाठी आमच्या आई वडिलांनीही केलं नाही. आमच्या आयुष्याचा वनवास दूर करण्यासाठी तुम्ही स्वतः जो वनवास सहन केलाय ना त्याचे मोल कोणत्याही रूपात फेडता येणार नाही. जोपर्यंत चंद्र, सूर्य, तारे आहेत, तोपर्यंत तुमचं नावं सन्मानाने घेतलं जाईल. आपल्या जयंतीच्या निमित्ताने आपल्या चरणी नतमस्तक होऊन माझा देह मरेपर्यंत समाजाच्या कार्याला वाहिल हा शब्द देतो.. शेवटी आमच्या रक्ताने जरी धुतले तुमचे पाय.. तरी तुमचे उपकार फिटणार नाय....

**नितीन केशरबाई आश्रुबाराव काळे**
सोशियल मीडिया प्रमुख बहुजन विकास मोर्चा.

# शिक्षक समन्वय संघाचा १४ एप्रिलपासून शिक्षकांच्या मागण्यांसाठी हुंकार

## प्रचंड संख्येने सहभागी होऊन आयुक्तांच्या दारात करणार हुंकार

मुंबई । प्रतिनिधी

राज्यातील खाजगी प्राथमिक, माध्यमिक, उच्चमाध्यमिक व वर्गतुकड्यांतील ६५ हजार विना तथा अंशतःअनुदानित शाळेतील शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी यांना शासननिर्णय १४ ऑक्टोबर २०२४ मधील वेतन अनुदान वितरणाचे आदेश १ जून २०२४ पासून विनाअट टप्पा वाढ लागू करण्यासठीचे टप्पा वाढ वेतन आदेश वाटप करणे या प्रमुख मागणीसाठी शिक्षक समन्वय संघावतीने पुणे आयुक्त कार्यालय येथे १४ एप्रिल २०२५ पासून हुंकार बेमुदत आंदोलन पुकारण्यात आले आहे.

राज्यातील 'कायम' शब्द काढलेल्या प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक व वर्ग तुकड्यावर सुमारे ६५ हजार शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी 'पंधरा ते वीस' वर्षां पासून काही 'विनावेतन' तर काही तुटपुंज्या वेतनावर काम करत आहेत. महाराष्ट्राच्या महान शैक्षणिक परंपरेचा हा अपमान आहे. शिक्षक दिनी शिक्षकांना देशाचे शिल्पकार, आधारस्तंभ म्हणायचे आणि त्यांच्या सेवेला वीस-वीस वर्षे झाली तरी विनावेतन राबवून घ्यायचे. एव्हढ्या प्रचंड कालावधीत विनावेतन आणि तुटपुंज्या वेतनावर काम करत असताना हे शिक्षक आपला उदरनिर्वाह कसा करत असतील याची जराही संवेदना राज्यकर्त्यांना नाही, या वेदना शासनापर्यंत पोहचवण्यासाठी शिक्षक समन्वय संघाच्यावतीने येत्या १६ ऑगस्ट पासून शासनाच्या दारी बेमुदत धरणे करण्यात आले तेव्हा कुठे १० ऑक्टोबर २०२४ रोजी शिक्षक समन्वय संघाच्या मागणीचा साकल्याने विचार करत मंत्रीमंडळाच्या बैठकीत निर्णय करत १४ ऑक्टोबर २०२४ रोजी शासननिर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

परंतू शासननिर्णय निर्गमित होऊन आज आठ ते दहा महिने झाले तरी सदरील शासननिर्णयाचे आयुक्त स्तरावरून अनुपालन होतांना दिसत नाही. या शासन निर्णयाचे आयुक्त स्तरावरून अनुपालन व्हावे यासाठी शासनस्तरावरून २६ नोव्हेंबर २०२४ रोजी स्वतंत्र आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. असे आदेश असतानाही अनुपालन न करणे म्हणजे शासनाने घेतलेल्या शाळा, शिक्षण आणि शिक्षक हिताच्या दृष्टीने अत्यंत निंदनीय बाब आहे. १४ ऑक्टोबर २०२४ च्या शासननिर्णयाचे अनुपालन करत तात्काळ टप्पा वाढ आदेश वितरित करण्याचे आदेश निर्गमित करणे याच मागणीसाठी शिक्षक बेमुदत हुंकार आंदोलन सुरू करण्यात येणार आहे.

त्यामुळे शिक्षकांच्या सहनशीलतेचा अंत न पहाता मा.आयुक्त महोदयांनी शाळा, शिक्षण आणि शिक्षक यांच्या मागण्याची तात्काळ दखल यथोचित न्याय देत आदेश दिले पाहिजे अशी भावना राज्यभरातील शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांच्या वतीने शिक्षक समन्वय संघाने निवेदनाद्वारे राज्याचे शिस्तप्रिय शिक्षण आयुक्त महोदय यांना केली आहे. अंशतः अनुदानित शाळेतील शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी पुणे येथील शिक्षण आयुक्त कार्यालय पुणे येथील आंदोलनात प्रचंड संख्येने सहभागी झाले पाहिजे. जोपर्यंत मागण्या मान्य होणार नाही तोपर्यंत शिक्षक समन्वय संघ मागे हटणार नाही असे आवाहन शिक्षक समन्वय संघाच्या वतीने प्रा.राहुल कांबळे, के.पी.पाटील, सौ.नेहाताई गवळी, प्रा.संतोष वाघ, प्रा.दिपक कुलकर्णी यांसह हजारो शिक्षक तथा शिक्षकेत्तर कर्मचारी सहभागी होणार आहेत.

> अंशतः अनुदानित प्राथमिक माध्यमिक, उच्चमाध्यमिक व वर्गतुकड्यांतील शिक्षक तथा शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या हिताचा निर्णय तात्कालिन सरकारने घेतला असतांना त्याच शासननिर्णयाचे अनुपालन करण्याची जबाबदारी मा.आयुक्त महोदय यांची असतांना ते जबाबदारीपासून पळ काढत आहे. त्यांनी पुढाकार घेत न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न करावेत.
>
> **- के.पी.पाटील,**
> समन्वयक, शिक्षक समन्वय संघ

> शासनाच्या वतीने अंशतःअनुदानित शाळेतील शिक्षकांना न्याय देण्यासाठी निर्णय होऊन आज ९ महिने उलटले तरी त्याचे अनुपालन होतांना दिसत नाही. सदरील शासननिर्णयाचे अनुपालन करणे व असे अनुपालन करण्याचे आदेश निर्गमित करण्यात येत नाही तोपर्यंत आंदोलन मागे घेणार नाही.
>
> **- प्रा.राहुल कांबळे,**
> समन्वयक, शिक्षक समन्वय संघ

> सरकारने नुकतीच लोकप्रिय लाडकी बहिण योजना आणली आहे. राज्य शासनाच्याच मान्यतेने सुरू असलेल्या अंशतःअनुदानित शाळेतील शिक्षिका मात्र गेल्या पंधरा वर्षां झाली वेतनापासून वंचित आहेत. या शिक्षिका सरकारच्या लाडक्या बहिणी नाहीत का?
>
> **- सौ.नेहाताई गवळी,**
> समन्वयक, शिक्षक समन्वय संघ

पान १ वरून...

## वाल्मिक कराडसोबत जवळगाव येथील गायरान जमिनीसंदर्भात मोठी डील?

करत पोलिसांना नेमका कुणी एवढा अधिकार दिला? हे मात्र चित्र समजू शकले नाही. अंबाजोगाईतील महसूल तहसीलदार विभाग, म्हणत आहे की, आमच्याकडे त्या जमिनीचा हस्तांतर करण्याच्या कुठल्याही हालचाली नाहीत आणि आम्ही पोलिसांना कुठलेही पत्र दिलेले नाही. मग पोलीस प्रशासन नेमकं जवळगाव येथील गायरान धारकांना उठवण्याचा प्रयत्न कोणाच्या इशारावरून करत आहेत. ज्या सोलार कंपनीचा एजन्सी व टेंडर ज्या व्यक्तीला मिळालेले आहे. ते तत्कालीन माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांचे स्विय्य सहाय्यक व त्यांचे नातेवाईक असल्याची चर्चा सध्या बीड जिल्ह्यामध्ये नागरिकांमध्ये ऐकायला मिळत आहे. त्यामुळे मंत्री पंकजा मुंडे, आ.धनंजय मुंडे, खा.बजरंग सोनवणे, आ. नमिता मुंदडा यांना दलितांची मते चालतात परंतु दलितांना मिळालेले हक्क चालत नाही का? असा सवाल या ठिकाणी उपस्थित केला जात आहे. तर या कंपनीकडून मंत्री.पंकजा मुंडे, आ. धनंजय मुंडे, खा. बजरंग सोनवणे, आ. नमिता मुंदडा यांच्याशी तडजोड झाल्याची ही चर्चा सध्या ऐकायला मिळत आहे परंतु दैनिक महाराष्ट्र आरंभ या लढ्यामध्ये आक्रमक पद्धतीने सहभाग नोंदवून राजकीय नेत्यांची स्पर्धा पास करणार आहे.

अंबाजोगाई तालुक्यातील जवळगाव येथील दलित समाजाच्या गायरान जमिनी गेल्या ४० ते ५० वर्षापासून कसरत आहेत. या जमिनीवर ती सोलर प्लांट उभा करण्यासाठी तत्कालीन मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांचे स्विय्य सहाय्यक मोरे नामक व्यक्ती असल्याचे सांगितले जात आहे. त्यांच्या जवळील नातेवाईकांच्या नावावरती संबंधित सोलार कंपनीची एक एजन्सी त्या ठिकाणी सोलार पंप उभारत आहे. गायरान जमिनी ही कसरत असताना त्यांच्याकडून जबरदस्तीने हिसकावून घेण्याचा प्रयत्न प्रशासनाकडून होत आहे. याला जबाबदार बीड जिल्ह्यातील राजकीय नेते आहेत तर या जमिनी संदर्भात परळी मतदारसंघांमध्ये जवळगाव हे गाव येत असल्यामुळे त्या ठिकाणी वाल्मीक कराड सोबत मोठी डील झाल्याची विश्वसनीय माहिती सूत्रांनी दैनिक महाराष्ट्र आरंभला दिली आहे. परंतु वाल्मीक कराड संतोष देशमुख हत्या प्रकरणांमध्ये सध्या जेलमध्ये असताना आता यामध्ये डील करण्यात आलेली आहे. या डील मध्ये पंकजा मुंडे, धनंजय मुंडे, बजरंग सोनवणे, नमिता मुंदडा या मातब्बर नेत्यांची नावे आहेत.

यांनी या गायरान जमिनी संदर्भात आवाज उठवा अशी मागणी आता बीड जिल्ह्यातील जनतेकडून होत आहे. जर राजकीय नेते गप्प राहिले तर बोलाचा भात आणि बोलाचीच कडी असे चित्र स्पष्ट पाहायला मिळत आहे. परंतु जवळगाव येतीलच नव्हे तर बीड जिल्ह्यातील अनेक ठिकाणी गायरानधारकावर अन्याय होत असताना बीड जिल्ह्यातील मातब्दार आ.धनंजय मुंडे, मंत्री पंकजा मुंडे, खा. बजरंग सोनवणे सह अनेक आजी-माजी आमदार पालकमंत्री हे गप्प का? आहेत असा प्रश्न आता बीड जिल्ह्यातील नागरिकांना पडलेला आहे.

## एकनाथ शिंदे अमित शाहांना एकांतात भेटले

मुंबई । प्रतिनिधी

रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्रीपदासाठी इच्छूक असणारे शिंदे गटाचे आमदार भरत गोगावले यांना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी तातडीने मुंबईला बोलावून घेतले आहे. एकनाथ शिंदे यांनी रविवारी सकाळी अमित शाह यांची मुंबईतील सह्याद्री अतिथीगृहावर भेट घेतली होती. यावेळी एकनाथ शिंदे यांच्यासोबत अन्य कोणीही नव्हते. अमित शाह यांच्यासोबत एकनाथ शिंदे यांनी तब्बल अर्धा तास वन टू वन चर्चा केली. त्यानंतर दुपारी एकनाथ शिंदेंकडून भरत गोगावले यांना महाडवरुन मुंबईला येण्याच्या सूचना देण्यात आल्या. त्यामुळे आता मुंबईत रायगडच्या पालकमंत्रीपदाबाबत निर्णायक चर्चा होणार का, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

अमित शाह यांनी शनिवारी रायगड किल्ल्यावरुन निघाल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते सुनील तटकरे यांच्या घरी जाऊन भोजन केले होते. सुनील तटकरे यांची कन्या अदिती तटकरे या रायगडच्या पालकमंत्रीपदाच्या प्रबळ दावेदार आहेत. त्यामुळे सुनील तटकरे आणि अमित शाह यांच्यात काल रायगडच्या पालकमंत्रीपदाबाबत चर्चा झाली असावी, असा अंदाज आहे. त्यानंतर आज सकाळी एकनाथ शिंदे आणि अमित शाह यांच्यात चर्चा झाली. त्यावेळी अमित शाह यांनी रायगडच्या पालकमंत्रीपदाबाबत एकनाथ शिंदे यांना कोणता मेसेज दिला असावा का, याविषयी तर्कवितर्क लढवले जात आहेत. त्यामुळे आता भरत गोगावले मुंबईत आल्यानंतर काय घडणार, हे पाहणे औत्स्युकाचे ठरेल.

# स्त्रियांचे खरेखुरे आराध्यदैवत: भारतरत्न परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर



बाबासाहेबांनी शुद्रांसाठी केलेले कार्य सर्वश्रुत आहे. परंतु महिलांसाठी त्यांनी केलेल्या कार्याचा हा संक्षिप्त आढावा. एका स्त्रीचे दुःख स्त्रीच समजू शकते या वाक्याला अक्षरशः खोटे ठरवत महाराष्ट्रातील स्वराज्यसंस्थापक छत्रपती शिवाजी महाराज, स्त्री शिक्षणाचे उद्धारकर्ते क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिराव फुले व भारतरत्न, परमपूज्य, संविधानलेखक, अर्थशास्त्रज्ञ, जगात नावलौकिक असलेले डॉ बाबासाहेब आंबेडकर या गुरु शिष्य त्रिकुटाने स्त्रियांच्या रक्षणाकरिता आणि उद्धाराकरिता आपले जीवन अर्पिले. ज्या महामानवाने पुस्तकांसाठी बंगला बांधला, त्यात २२ हजारांपेक्षा ही जास्त पुस्तकांचा संग्रह होता. अन्न, वस्त्र, निवारा याप्रमाणेच पुस्तके ही देखील मानवाची मूलभूत गरज आहे असे मानणारे, त्यांनी जवळपास पूर्ण झालेले एकूण २२ ग्रंथ, अपूर्ण असलेले दहा ग्रंथ, १० शोधनिबंध असे भरपूर पुस्तके लिहिली. पुस्तके खरेदी करण्यासाठी पैसे नसल्याने ग्रंथालयांमध्ये दिवस रात्र बसणारे, उच्च कोटीचे पुस्तक प्रेमी भारतरत्न परमपूज्य डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी एका पुस्तकाचे सार्वजनिक दहन करावे ? का ? काय असेल त्या पुस्तकात की त्यांनी एवढे टोकाचे पाऊल उचलले.

डॉ. बाबासाहेबांनी २५ डिसेंबर १९२७ रोजी महाड येथे मनुस्मृतीचे दहन केले; जे केवळ पुस्तक जाळणे नव्हते तर त्यातील दडपशाही विचारसरणीला विरोध दर्शविण्यासाठी आणि सामाजिक न्यायासाठी एक पाऊल होते. मनुस्मृति या पुस्तकामध्ये स्त्रियांविषयी अतिशय जाचक प्रथा नमूद केल्या होत्या की महिलांना कोणताही धार्मिक विधी करण्याचा, नवस करण्याचा किंवा उपवास करण्याचा कोणताही दैवी अधिकार नाही. तिचे एकमेव कर्तव्य म्हणजे तिच्या पतीची आज्ञा पाळणे आणि त्याला संतुष्ट करणे तरच तिला स्वर्गात उच्च स्थान मिळेल. पतीच्या कर्तव्याचे आणि आचारसंहितेचे उल्लंघन करणारी कोणतीही महिला अपमानित होते आणि तिला कुष्ठरोग होतो. मृत्यूनंतर ती कोल्हाळाच्या गर्भाशयात प्रवेश करते. धार्मिक विधी करण्यात काही अडचण असल्यास २४ ते ३० वयोगटातील पुरुषांनी ८ ते १२ वयोगटातील मुलीशी लग्न करावे. एक स्त्री कधीही स्वतंत्र असू शकत नाही, विधवा स्त्रीला जगण्याचा अधिकार नाही आणि जगलीच तर तिने कुरूप दिसावे तिला नटण्याचा, सुंदर दिसण्याचा अधिकार नाही. पुनर्विवाह तर खूप दूरची गोष्ट. एका विधवा स्त्रीला कोणत्याही धार्मिक किंवा सामाजिक कार्यक्रमात जायची परवानगी नसे. असे एक न अनेक अत्याचार स्त्रियांना सोसावे लागत असत. शूद्रांची अवस्था तर त्या पेक्षा ही कठीण.

डॉ. बाबासाहेबांनी मनुस्मृति फक्त जाळलीच नाही तर स्त्रियांना समान वागणूक मिळावी यासाठी ४ वर्षे १ महिना आणि २६ दिवस काम करून हिंदू कोड बिल तयार केले. डॉ. बाबासाहेब एक प्रख्यात वकील होते. त्यांना काही विशेष वर्ग किंवा विशेष जातीच्या स्त्रियांना त्याचा फायदा होईल अशी अपेक्षा नव्हती. त्यांना सर्व जाती आणि वर्गाच्या स्त्रियांच्या अधिकारांचे संरक्षण करायचे होते. स्वतंत्र भारताचे पहिले कायदेमंत्री म्हणून डॉ बाबासाहेबांनी १९४८ मध्ये संविधान सभेत हिंदू कोड बिलचा मसुदा प्रस्तुत केला. परंतु प्रतिगामी विचारांच्या काही सभासदांनी त्याला विरोध केल्यामुळे ते समंत होऊ शकले नाही. त्यामुळे त्यांनी २५ सप्टेंबर १९५१ ला पंतप्रधान पंडित नेहरू यांच्याकडे राजीनामा पाठविला. त्यात त्यांनी लिहिले, 'हिंदू कोड बिलाचा खून झाल्यामुळे मी राजीनामा देत आहे'. सत्तेपेक्षा महिलांना हक्क मिळणे त्यांना महत्त्वाचे वाटत होते. त्यांनी सत्तेसाठी तत्व सोडले नाहीत, तर तत्त्वासाठी सत्तेचा त्याग केला. तरीही आज लोक त्यांना जातीच्या तराजूमध्ये तोलतात. विशिष्ट जातीच्या लोकांकडूनच त्यांचा आदर व्हावा, असे तर नव्हते आपले बाबासाहेब. त्यांनी सर्वांसाठी जिथे जिथे अन्याय होतोय तिथे तिथे न्याय केला आणि मरेपर्यंत समता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला प्रत्येक स्त्रीला हिंदू कोड बिल काय आहे हे जाणून घेणे अत्यावश्यक आहे.

त्यांनी स्त्रीला घटस्फोट देण्याचे अधिकार दिले. त्याच बरोबर विधवा आणि मुलींना संपत्तीमध्ये अधिकार दिला. स्त्रिया बाळ दत्तक घेऊ शकतात, त्या पुनर्विवाह करू शकतात, पुरुषांना बहुपत्नीत्वापासून रोखले गेले. तसेच बाबासाहेबांनी मजुरांसाठी खूप मोठे कार्य केले. त्यांनी पाहिले कि महिला पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून खाण काम करू लागल्या आहेत. मजूर मंत्री म्हणून खाण महिला आणि कामगारांसाठी तरतुदी केल्या. ज्याप्रमाणे पुरुष खाणकामगाराबद्दल डॉ. आंबेडकरांनी विचार व्यक्त केले, त्याचप्रमाणे स्त्रियां बाबतीतही २९ मार्च १९४५ ला विधेयक आणून चर्चा केली. प्रसुतीच्या काळात विश्रांतीची तरतूद, रोख मदत, किमान चार आठवडे प्रसूती भत्ता मिळावा तसेच कामगार गैरहजर असताना पगारी सूट्टी, स्त्री व पुरुषांना समान वेळेसाठी समान वेतन मिळावे यासाठी त्यांनी कायदे बनविले. आज आपल्याला या गोष्टी साधारण वाटतात पण त्या काळच्या स्त्रियांनी या जाचक प्रथांमुळे जो अन्याय सहन केला आहे, त्यांची वेदना डॉ बाबासाहेबांनी समजून घेतली. आज कोणत्याही देवाने किंवा कोणत्याही धर्माने नव्हे तर बाबासाहेबांनी आपल्याला हक्क दिले आणि त्यामुळे स्त्री आता एका मंदिराची पुजारी आहे, ती अंतराळात जाऊन येण्याची धमक ठेवते, ती एक अर्थशास्त्रज्ञ आहे, ती एक राष्ट्रपती होऊन देश चालवू शकते, ती एक पायलट आहे. जी पुरुषांप्रमाणेच आकाशात उंच भरारी होऊ शकते, संसदेमध्ये निर्भीडपणे बोलू शकते. बाबासाहेबांची दूरदृष्टी आणि स्त्रियांबद्दलची आस्था त्यांच्या प्रत्येक भाषणातून दिसून यायची. त्यांनी दलितांसाठी, पीडितांसाठी जे कार्य केले ते सर्वश्रुत आहे, परंतु महिलांसाठी त्यांनी जे मोलाचे कार्य केले ते आपण विसरून चालणार नाही. प्रत्येक स्त्रीने त्यांनी आपल्यासाठी केलेल्या कार्यासाठी ऋणी असले पाहिजे. त्यांना जातीच्या बंधनातून मुक्त करून एक माणूस म्हणून त्यांनी माणसाच्या अस्तित्वासाठी आणि चांगले जीवन जगण्यासाठी जो संघर्ष केला त्याचा आपण आदर्श घेऊन आदर केला पाहिजे. सर्व स्त्रियांनी बाबासाहेब एकदातरी वाचलेच पाहिजे. हीच त्यांच्या जयंतीनिमित्त त्यांना आदरांजली असेल.

**अश्विनी डोळस - बनसोडे**
**ग्राम महसूल अधिकारी , बीड**

# झाडावरच टोमॅटो पिकुन गळु लागले

## भाव नसल्याने उत्पादन खर्चही निघेना; मुळुकवाडी येथील शेतकरी अशोक ढास यांची खंत : डॉ.गणेश ढवळे

लिंबागणेश । प्रतिनिधी

उन्हाची तिव्रता वाढल्याने टोमॅटो पिकाला याची झळ बसल्याने झाडावरच टोमॅटो पिकुन गळु लागले आहेत. टोमॅटोचे दर घसरले असुन यातुन शेतातील खत, बियाणे, मजूरी याचा प्रचंड खर्च असुन टोमॅटो अवघ्या ५ ते १० रूपये किलो दराने विकावे लागत असुन उत्पादन खर्च देखील निघत नसल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडला असून शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. बाजारातील टोमॅटोची आवक वाढल्याने दरात घसरण झाल्याचे बोलले जाते. उत्पादन खर्चापेक्षाही कमी भाव मिळत असल्याने शेतकरी हवालदिल झाला असुन विक्रीला परवडत नसल्याने झाडावरच पिकुन गळत असल्याचे सांगत टोमॅटो बरोबरच कष्टही मातीमोल ठरल्याची उद्विग्न प्रतिक्रिया मुळुकवाडी येथील टोमॅटो उत्पादक शेतकरी अशोक मल्हारी ढास यांनी डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्याशी बोलताना दिली.

**टोमॅटो बरोबरच कष्टही मातीमोल ; उत्पादन खर्चापेक्षा मिळतोय कमी भाव : अशोक ढास**

गेल्या वर्षी टोमॅटोला जवळपास १०० रूपये किलो भाव मिळाला होता. म्हणून टोमॅटोची लागवड केली. एकरी सव्वा लाख रुपयांपर्यंत खर्च आला. टोमॅटोचे पिक सुद्धा चांगले आले आहे.मात्र भाव नसल्यामुळे टोमॅटो विक्रीसाठी काढायला सुद्धा परवडत नाही. १०० रूपये कॅरेट भाव असुन चाकण, पुणे, नारायणगाव याठिकाणी विक्री साठी पाठवतोत. पण कॅरेट मागे वाहतुक खर्च ६० रूपये, टोमॅटो तोडण्यासाठी महिला मजूर ३०० रूपये रोज तसेच आडत, कमिशन आदी मिळुन ८०-९० रुपये खर्च येतो. म्हणून टोमॅटोची झाडावरच पिकुन गळती होत आहे. चांगला भाव मिळाला असता तर दैना फिटली असती परंतु आपलं नशीब फुटकं म्हणून सहन करायचं अशी मनातली सल अशोक ढास यांनी बोलून दाखवली.



# वडवणी येथील 'भीम' जन्मोत्सवाचे कार्यक्रम जाहीर

## उद्याच्या विविध कार्यक्रमाला हजारोच्या संख्येने उपस्थित रहा : राहुल घाडगे

वडवणी । प्रतिनिधी

विश्वरत्न, परमपूज्य, बोधिसत्व, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समिती वडवणी यांच्या वतीने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या भीम जन्मोत्सवाचे कार्यक्रम कालच जाहीर करण्यात आले असून उद्या विविध कार्यक्रमाचे देखील आयोजन करण्यात आले आहे. तरी या सर्वच कार्यक्रमाला वडवणी शहरासह तालुक्यातील तमाम समाजबांधवा सह बहुजन समाजाने उपस्थित राहावे. असे आव्हान वडवणी येथील जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष व नगरपंचायतीचे नगरसेवक राहुल घाडगे यांनी केली आहे.



याबाबत अधिक माहिती अशी की, विश्वरत्न परमपूज्य, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची दरवर्षीप्रमाणे याही वर्षी वडवणी शहरात विविध सामाजिक कार्यक्रम घेऊन जयंती उत्साहात पार पडणार आहे. तर याबाबतचे कार्यक्रम देखील जाहीर करण्यात आले आहेत. आज मध्यरात्री रात्री ११.३० वा. वडवणी शहरातील लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौक ते विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकापर्यंत भव्यदिव्य अशी भीमज्योत रॅली काढण्यात येणार आहे. तर उद्या सकाळी ठीक ९ वा. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौक ते विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकापर्यंत भव्य दिव्य अशी मोटरसायकल रॅली काढण्यात येणार आहे. तर उद्या ठीक १० वा. विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे विविध मान्यवरांच्या उपस्थितीत निळा ध्वजाचे ध्वजारोहणाचा कार्यक्रम होणार आहे. तर लगेच याठिकाणी ११ वा. विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक या ठिकाणी महास्नेह भोजनाचा कार्यक्रम होणार आहे. हा भोजनाचा कार्यक्रम सकाळी ११ ते ७ वाजेपर्यंत असणार आहे.

या वरील चार ही कार्यक्रमाला वडवणी शहरासह तालुक्यातील तमाम आंबेडकर विचार व विचाराच्या समाज बांधवांनी या कार्यक्रमाला उपस्थित राहून कार्यक्रमाचा लाभ तसेच भोजनाचा स्वाद घ्यावा असे आव्हान जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष व वडवणी नगरपंचायतीचे नगरसेवक युवा नेते राहुल घाडगे, कार्याध्यक्ष परमेश्वर उजगरे, उपाध्यक्ष बाबासाहेब वाघमारे, प्रशांत (लखन) उजगरे, समाधान उजगरे, दिलीप रोकडे, सचिव- अमोल मुरालीधर उजगरे, कोषाध्यक्ष- शाम सुधाकर उजगरे, संघटक प्रज्वल उजगरे, अजिंक्य उजगरे, सहसंघटक अमोल वाघमारे, युवराज उजगरे, सहसचिव किरण उजगरे (आमदार), राज उजगरे, रामेश्वर पाटोळे यांनी केले आहे. तर दि.२२ एप्रिल २०२५ वार मंगळवार रोजी सायंकाळी ७ वाजता महाराष्ट्राचे ख्यातनाम आनंद शिंदे यांचे चिरंजीव युवागायक व संगीतकार उत्कर्ष शिंदे यांचा भिमगीताचा कार्यक्रम होणार आहे. तर दि.३० एप्रिल २०२५ वार बुधवार रोजी सायंकाळी ४ वाजता विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची भव्य दिव्य अशी मिरवणूक निघणार आहे. तरी या कार्यक्रमाला देखील उपस्थित राहण्याचे आव्हान जयंती उत्सव समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त पिंपळनेर पोलीस स्टेशन या ठिकाणी शांतता कमिटीची बैठक संपन्न

## संतोष तावरे यांच्या आयोजित बैठकीला डीवायएसपी पूजा मॅडम यांची उपस्थिती

बीड । प्रतिनिधी

भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार, विश्वरत्न महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंती निमित्त बीड शहरातील पिंपळनेर या गावी असलेले पिंपळनेर पोलीस स्टेशन या ठिकाणी आज पिंपळनेर पोलीस स्टेशन च्या हद्दीमध्ये येत असलेले सर्व गावांची आणि भीमजयंतीच्या आयोजकांची महत्वपूर्ण शांतता बैठक पोलीस स्टेशन येथे कार्यरत असलेले डीएसबी संतोष तावरे यांच्या आयोजनाखाली पार पडली.



या बैठकीला प्रमुख उपस्थिती म्हणून डीवायएसपी पूजा मॅडम यांची उपस्थिती लाभली असता परिसरातील सर्व आंबेडकरी युवक, जयंती उत्सव समिती या बैठकीला मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. या बैठकीमध्ये पूजा मॅडम यांनी नागरिकांना शांततेचे आव्हान केले. १४ एप्रिल हा दिवस जगभरात मोठ्या उत्साहात आनंदात साजरा केला जातो. हा उत्सवामध्ये आपण सर्वानी सहभागी झाले पाहिजे. परंतू जयंती साजरा करत असताना डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची जयंती ही अतिशय शांततेत आणि आनंदात साजरी झाली पाहिजे. जयंती मध्ये कुणीही मध्यपान आथवा जयंतीचा भंग होईल असे कृते कुणीही करू नये, प्रत्येक जयंती आयोजकानी जयंती चांगल्या प्रकारे पार पडावी आणि पोलिसाना सहकार्य करावे असे जाहीर आव्हान या वेळी पूजा मॅडम यांनी केले. या वेळी अनेक जयंती उत्सव समितीने आपल्या आडचणी या बैठकीमध्ये मांडल्या, आणि कसल्याही प्रकारे भीमजयांतीला गाल बोट लागणार नाही, कायदा आणि सुवेवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही, पोलिसाना चांगल्या प्रकारे सहकार्य होईल अशी हमी या वेळी सर्व जयंती उत्सव समितीने दिली. बैठकीचे आयोजक डीएसबी संतोष तावरे आणि प्रमुख उपस्थिती म्हणून डीवायएसपी पूजा मॅडम यांचे शांतता बैठकीला उपस्थित असलेल्या भीमसैनिकानी आभार व्यक्त केले आणि भीमजयंतीच्या सुभेच्छा दिल्या. या वेळी अनेक युवक, माध्यम वर्ग उपस्थित दिसत आहे.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त आदर्श देवगावात विविध स्पर्धा व कार्यक्रमाचे आयोजन

## कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन

वडवणी । प्रतिनिधी

भारत देशातच नव्हे तर संपूर्ण जगामध्ये विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती मोठ्या थाटामाटात साजरी होणार आहे. भारतीय राज्यघटनेचा भारत देशालाच नव्हे तर जगाला हेवा वाटावा असा हा ग्रंथ डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी लिहून या भारताला जगाचा नकाशावर नेऊन ठेवले आहे. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय इतिहासातील एक प्रमुख व्यक्तिमत्त्व आहेत. ज्यांनी शिक्षण व राजकारणाचा क्षेत्रात महत्वपूर्ण योगदान दिले त्यांनी जगातील काही प्रतिष्ठित संस्था म्हणून शिक्षण घेतले जात मुंबईतील एलिफन्टन कॉलेज युके मधील लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स आणि अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठ यांचा समावेश आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा, हा मूलमंत्र देत बहुजनांना उन्नती आणि समाजोद्धाराचा मार्ग दाखवला. सामाजिक न्याय व समतेचा पुरस्कार करत समाजातील उपेक्षितांसाठी संघर्ष करणारे महामानव, प्रज्ञासूर्य भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना जयंती दिनी विनम्र अभिवादन!



वडवणी तालुक्यातील आदर्श देवगाव येथे विश्वरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समिती यांच्यावतीने नियोजन केलेले आहे. दिनांक १४ एप्रिल २०२५ रोजी सकाळी ठीक आठ वाजता डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन व ध्वजारोहण होईल. तसेच मंगळवार दिनांक २२ एप्रिल २०२५ रोजी सायंकाळी सहा वाजता महाराष्ट्रात सर्वत्र गाजत असलेले तुफान विनोदी समाज प्रबोधनकार सत्यपाल महाराजांचे शिष्य इंजिनीयर पवन महाराज दंवडे यांचा कार्यक्रम होईल.

मंगळवारी सायंकाळी आठ वाजता बक्षीस वितरण होईल त्यामध्ये निबंध स्पर्धा चित्रकला स्पर्धा गावची एक लाडकी लेक लक्की ड्रॉ कन्यादान योजना मंगळवारी ठीक आठ वाजता कार्यक्रम होईल. व तसेच बुधवार दिनांक २३ एप्रिल २०२५ सायंकाळी पाच वाजता विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे भव्य मिरवणूक होईल या कार्यक्रमास उपस्थित राहण्यासाठी विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समिती देवगाव यांच्या वतीने करण्यात आलेले आहे.

# हरिनाम सप्ताह सामाजिक एकतेचे संस्कार केंद्र : मस्के

## बेलगाव येथे अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता

बीड । प्रतिनिधी

प्रख्यात देवस्थान बेलेश्वर परिसरातील बेलगाव येथे बेलेश्वर संस्थान महंत महादेव महाराज यांच्या प्रमुख उपस्थितीत व हभप तुकाराम महाराज यांच्या काल्याच्या किर्तनाने सांगता झाली. यावेळी राजेंद्र मस्के यांनी भक्तांना संबोधीत करताना संबोधीत केले.



अखंड हरिनाम सप्ताह म्हणजे केवळ धार्मिक कार्यक्रम नाही, तर आपल्या जीवनात सकारात्मक बदल घडवणारा एक पवित्र सोहळा आहे. हरिनाम सप्ताहा दरम्यान घडणारे प्रभूचे नामस्मरण भजन, कीर्तन, प्रवचनाच्या माध्यमातून भक्तिरस अनुभवता येतो. नामस्मरणाने मनाला शांती मिळते, मानसीक तणाव दूर होण्यास मदत होते. ईश्वरावरील श्रद्धा वाढीस लागते. ईश्वरा पुढे सर्वजण समान असतात या भावनेतून अशा मंगलमय सोहळ्यात भेदभाव विसरून ईश्वर भक्त निरपेक्ष भावनेने सहभागी होतात.

समाजामध्ये एकोपा, प्रेम आणि परस्परांत सहकार्य भावना निर्माण होते. ग्रामीण संस्कृतीत सप्ताहाला वेगळं महत्त्व आहे. गावो गावी होणारे अखंड हरिनाम सप्ताह सामाजिक एकतेचे संस्कार केंद्र व्हावेत अशी भावना शरदचंद्र पवार राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी बेलगाव येथील अखंड हरिनाम सप्ताह सांगता समारंभ प्रसंगी भाविक भक्तांना संबोधित करताना व्यक्त केली आहे.

प्रख्यात देवस्थान बेलेश्वर परिसरातील बेलगाव येथे बेलेश्वर संस्थान महंत महादेव महाराज यांच्या प्रमुख उपस्थितीत व हभप तुकाराम महाराज यांच्या काल्याच्या किर्तनाने सांगता झाली. यावेळी अश्विन शेळके, दिलीप शेळके, जाधव अशोक, अंकुश शेळके, बबन शेळके, सुखदेव कोळपे, महेश सावंत, कल्याण पवार आदी मान्यवर उपस्थित होते.



# क्रांतीकारी लाईनस्टाप सेना मंडळ अध्यक्ष पदावर शेख एजास यांची नियुक्ती

बीड । प्रतिनिधी

क्रांतीकारी लाईनस्टाप सेना प्रमुख प्रशांत लबडे पाटील यांच्या आदेशाने क्रांतिकारी लाईनस्टाप सेनेच्या श्री. शेख एजास फकीर मोहम्मद यांची मंडळ अध्यक्ष पदावर नियुक्ती वर्ष २०२५-२६ साठी निवड करण्यात आली आहे. तन मन धनाने लाईनस्टाप एकीकरण जागृतिककरण करून त्यांच्या प्रश्नांना वाचा फोडून न्याय मिळवून देण्यास समर्थपणे पुढाकार घेऊन लाईनस्टापचे व संघटनेचे अस्तित्व मजबूत कराल, असा विश्वास दाखवण्यात आला. त्या निमित्त नूतन नियुक्त झालेले शेख एजाज भाई यांची बीड येथील मराठवाडा प्रादेशिक कार्यालय मध्ये नियुक्तीपत्र देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळीस उपस्थित मराठवाडा प्रादेशिक अध्यक्ष शेख अमीर मदनी, बीडमंडळ सचिव श्री अश्वलिंग बरे, कार्याध्यक्ष श्री गजानन सोळंके, विभागीय अध्यक्ष श्री.रजनीकांत तागड, सचिव श्री गणेश कागदे, राहुल मस्के, प्रवीण शिंदे, दत्ता माटे, आदित्य देशमुख, गणेश माने, गेवराई उपविभागीय पदाधिकारी सुनील बारटक्के व संघटनेचे इतर पदाधिकारी उपस्थित होते.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांचे बक्षीस वितरण

परळी । प्रतिनिधी

तेज कोचिंग क्लासेस च्या माध्यमातून भीम नगर येथे विद्यार्थी घडवण्याचे काम सुरू असून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ जयंतीच्या निमित्ताने विविध स्पर्धा घेण्यात आले होत्या. त्यामध्ये विजेत्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्रा.डॉ. विनोद जगतकर, प्रमुख उपस्थिती माजी नगराध्यक्ष बाजीराव धर्माधिकारी, विधीतज्ञ ॲाड. दिलीप उजगरे, संपादक बालाजी जगतकर, दत्ता सावंत, सय्यद सिराज, रमेश गायकवाड, भारत ताटे, अविनाश वाले, उपस्थित होते. मान्यवरा हस्ते स्पर्धेत यशस्वी विद्यार्थ्यांना बक्षीस देण्यात आली. लिंबू चमचा स्पर्धेत पहिला माही कपील




समींदरसवळे, सपना महादेव जगतकर, तेज प्रताप समिंदरसवळे, पोर्णिमा चंद्रमणी समिंदरसवळे, पृथ्वी संतोष पैठणे, बुध्दप्रिया विशाल कांबळे, चित्रकला स्पर्धेत प्रथम सलोनी, सिद्धधन साळवे, समर दशरथ जगतकर, संगीत खुर्ची स्पर्धा पायल देवीदास, गायकवाड, गायत्री दुर्योधन साळवे, सामान्यू ज्ञान स्पर्धा प्रथम मन देविदास गायकवाड, रोहीणी मुंजाजी दहिवाडे, जयसेन चंद्रमणी समिंदरसवळे, पृथ्वीराज बालाजी कसबे, रुद्राक्ष साळवे सम्राट जगतकर यांना बक्षिसे वितरित करण्यात आली. बक्षीस वितरण झाल्यानंतर सांस्कृतिक कार्यक्रमांची मेजवानी सादर करण्यात आली. त्यामध्ये अनेक विद्यार्थ्यांनी आपल्या नृत्य कलेचे प्रदर्शन केले. त्यावेळी या परिसरातील महिला नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. आणि लवकरच भीमनगर येथे भव्य अशी अभ्यासिका केंद्र उभारण्याचा निर्धार असल्याचेही लॉर्ड बुद्धा फाउंडेशनचे अध्यक्ष व सचिव यांनी कळवलं. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी लॉर्ड बुद्धा फाउंडेशन व तेजस कोचिंग क्लासेसचे अध्यक्ष प्रताप समिंदरसवळे, संचालक सुमेर समिंदरसवळे, राज जगतकर, सत्यपाल जगतकर, धम्मपाल जगतकर, परमेश्वर अवचारे, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आनंद तूपसमुद्रे त्यांनी केले.

# माजी मंत्री आ.धनंजय मुंडेचा परळीत जनता दरबार पहिल्यांदा

## आमदार धनंजय मुंडे गेल्या दोन दिवसांपासून परळी दौऱ्यावर

परळी वैजनाथ । प्रतिनिधी
काल शनिवार रोजी नेहमीपेक्षा वेगळं दृश्य दिसलं यामध्ये परळी तालुक्यातील जनतेची मोठी गर्दी तक्रारीचा ओघ त्या तक्रारीवर बारकाईने लक्ष घालून आमदार धनंजय मुंडे यांचा जगमित्र कार्यालय येथे जनता दरबार धनंजय मुंडे यांच्या जनता दरबाराचा जनतेच्या प्रश्नांना थेट ऐकून घेण्यासाठी आणि त्यावर तात्काळ उपाययोजना करण्यासाठी त्यांनी हा विषय संवाद साधला नागरिक कार्यकर्ते पदाधिकारी अशा विविधआणि त्या प्रत्येक बाबींचा गांभीर आणि परीक्षण करत धनंजय मुंडे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना लगेच हाउसफुल चार महिन्यानंतर पहिल्यांदा दिसला परळीतील मुस्लिम बांधवांनी त्यांना रुमाल व टोपी घालून त्यांचे स्वागत



करण्यात आलं व त्यांना शुभेच्छा यावेळी परळी तालुक्यातील बरेच लोकांच्या कामाची पाहणी करून अडीअडचणी ऐकून घेतल्या.
संतोष देशमुख खून प्रकरणापासून ते त्यांना मंत्रिपदाचा राजीनामा द्यावा लागला पण त्यांनी माझी प्रकृती बरी नसल्यामुळे मी राजीनामा देतो असं स्वीट केलं. त्यानंतर ते कुठे दिसत नव्हते आता त्यांनी परळी मध्ये जनता दरबार घेतला आहे. परळी तालुक्यातील जनतेच्या समस्या सोडवण्यासाठी पुन्हा धनंजय मुंडे सक्रिय दिसून येत आहेत. अधिकाऱ्यांना पण त्यांनी कामाच्या सूचना देण्यात दिल्या आहेत परळी मध्ये जनता दरबार घेतला जनता दरबारातून मुंडेंनी स्थानिकांशी संवाद साधतात कामाचा निवाडा करण्यात आला व मी प्रकृतीच्या कारणास्तव धनंजय मुंडे काही दिवस सक्रिय नव्हते जनता दरबारातून धनंजय मुंडे पुन्हा एकदा सक्रिय झालेले आहेत. सामान्य जनतेच्या समस्या चे प्रश्न सोडवण्याच्या सूचना अधिकाऱ्यांना त्यांनी लागली च दिल्या आहेत.
गेल्या काही दिवसात संतोष देशमुख हत्याकांड व करुणा शर्मा मुंडे प्रकरण झाल्यापासून ते राजकारणापासून दूर राहिले होते व कार्यकर्त्यापासून लांब होते त्यांनी पहिल्यांदा जनता दरबार जगमित्र कार्यालय परळी वैजनाथ येथे सुरुवात केली आहे व काही दिवसापूर्वी संतोष देशमुख हत्याकांड मधील एक नंबरचा आरोपी असलेला वाल्मीक कराड त्याच जगमित्र कार्यालयात जनता दरबार घेत होता. जगमित्र या ठिकाणी आमदार धनंजय मुंडे त्यांनी जनता दरबार घेतला आहे. व जनता व कार्यकर्ते व मुस्लिम समाज यामध्ये आपल्या समस्या घेऊन आमदार धनंजय मुंडे यांच्याकडे घेऊन आलेली दिसत आहेत. यामध्ये परळी तालुक्यातील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे कार्यकर्ते उपस्थित होते.



## सावरगाव (च.) ग्रामस्थांची भगवानगडाला ५१ लाख रुपये देणगी जाहीर

भगवानगड । प्रतिनिधी
श्री क्षेत्र भगवानगडावरील नियोजित श्री संत ज्ञानेश्वर माऊलींच्या करोडो रुपये खर्च असणाऱ्या मंदिरासाठी महाराष्ट्रातून मोठ्या प्रमाणात देणग्या सुरू झालेल्या आहेत. गडाच्या भक्तवर्गापैकी अनेक गावांनी आपापल्या देणग्या जाहीर करून देणगीची रक्कम गडाचे मठाधिपती, न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबांकडे सुपूर्द केली आहे. देणगीचे बाकी असलेले गावकरी बाबांना सप्ताहानिमित्त किंवा इतर धार्मिक कार्यक्रमानिमित्ताने गावात बोलावून बाबांसमोर आपापले देणगीचे आकडे जाहीर करतात. नंतर संपूर्ण ग्रामस्थ एक विशिष्ट तारीख ठरवून बाबांना बोलावून घेतात व जाहीर केलेली देणगी बाबांकडे सुपूर्द करतात.
श्री क्षेत्र भगवानगडाचे विद्यमान मठाधिपती, ह.भ.प.न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबांनी श्री क्षेत्र भगवानगडावर माऊलींचे मंदिर बांधण्याचे ठरविले आणि संपूर्ण महाराष्ट्रातून मंदिरासाठी देणग्यांचा ओघ सुरु झाला आहे. न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबा हे मौजे सावरगाव चकला (ता.शिरूर जि.बीड) येथे आले असता ग्रामस्थांनी गडावरील माऊलींच्या मंदिरासाठी देणगी द्यायचे ठरविले. त्यानुसार ग्रामस्थांनी आपापल्या देणगीचे आकडे जाहीर केले. जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार संपूर्ण आकडेवारीची गोळाबेरीज ही ५१ लाख रुपये झाली.
नोकरी/व्यवसायानिमित्ताने बाहेरगावी असणाऱ्या ग्रामस्थांच्या देणगीचे आकडे आणखी बाकी आहेत. एकंदरीत श्री क्षेत्र भगवानगडाचा भक्तवर्ग गडावरील माऊलींच्या मंदिराला आर्थिक स्वरुपात हातभार लावण्यासाठी सरसावलेला दिसून येत आहे. त्यामुळे या अभूतपूर्व मंदिरासाठी सर्व ग्रामस्थांनी सहकार्य करावे असे आवाहन श्री क्षेत्र भगवानगड ट्रस्टतर्फे करण्यात आले आहे.

## सिरसाळा शिवसेनेचे मोठे यश
### आरोग्य केंद्रातील रिक्त पदे भरण्याचे उप संचालकाचे आदेश

सिरसाळा । प्रतिनिधी
सिरसाळा प्राथमिक आरोग्य केंद्रात गेल्या अनेक वर्षापासून कर्मचाऱ्यांची पदे रिक्त असल्याने रुग्णांचे मोठे हाल होत होते.



सिरसाळा व ग्रामीण भागातील रुग्णांना वेळेवर उपचार मिळत नसल्याने त्यांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला होता याविषयी राज्याचे सार्वजनिक आरोग्यमंत्री प्रकाश आबीटकर यांच्याकडे सिरसाळा शिवसेनेचे शहरप्रमुख कैलास कावरे यांनी युवासेना मराठवाडा निरीक्षक बाजीराव दादा चव्हाण व शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन भैय्या मुळूक यांच्या मार्गदर्शनाखाली निवेदन दिले होते.
दिनांक १२ ३ २०२५ रोजी निवेदनात सिरसाळा प्राथमिक आरोग्य केंद्रातील रिक्त पदे व इतर सुख सुविधेबद्दल याबद्दलची माहिती निवेदनाद्वारे दिली असता या निवेदनावर मंत्री महोदयांनी तात्काळ तपासून कार्य करण्याच्या संबंधित विभागाला आदेश दिले होते त्या आदेशानुसार उपसंचालक चव्हाण यांनी जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा परिषद बीड यांना सिरसाळा शहर प्रमुख कैलास कावरे यांच्या निवेदनाचा संदर्भ देऊन सिरसाळा प्राथमिक आरोग्य केंद्रातील रिक्त पदे यासह नविन संरक्षण भिंत, सीसीटीव्ही कॅमेरे, नवीन बोर, लाईट डीपी, किरकोळ दुरुस्ती, अंतर्गत सिमेंट रस्ते, डॉक्टर अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी निवासस्थाने विषयांवर कारवाई करण्याचे आदेश जिल्हा आरोग्य अधिकारी यांना आरोग्य भवन च्या उपसंचालिका यांनी आदेश दिले असून यामुळे सिरसाळा परिसरात सुमारे ५० ते ६० गावे आहेत या गावातील रुग्णांना उपचारासाठी सिरसाळा प्राथमिक आरोग्य केंद्रावर अवलंबून राहावे लागते. रुग्णांना वेळेवर उपचार मिळत नाहीत रुग्णांना तातडीच्या उपचारासाठी खाजगी रुग्णालयात धाव घ्यावी लागत होती रिक्त पद भरल्यानंतर येणाऱ्या काळात त्यांचा आर्थिक भुर्दंड आता वाचणार असून यामुळे सिरसाळा शिवसेनेच्या शहर प्रमुख कैलास कावरे यांनी केलेल्या पाठपुरावा बदल नागरिकांतून समाधान व्यक्त करीत आहेत सर्व स्तरातून शिवसेने बदल समाधान व्यक्त केले जातात.

## केज तालुक्यातील काही गावात जलजीवनच्या नावाखाली झाला काळाबाजार

### सुशांत खवतड गुत्तेदारावर कारवाई कधी?

केज । प्रतिनिधी
तालुक्यातील बेलगाव मध्ये जल जिवन काम बोगस केले असून येथील लोकांना पिण्याच्या पाण्याचा गंभीर प्रश्न उत्पन्न झालेला आहे. गुत्तेदाराने जलजिवनचे काम बोगस केले आहे. गुत्तेदार पेसै खाऊन मोकळा होतो. बेलगाव मध्ये जलजिवनचे काहीच काम झालेले नसताना सुशांत खवतड नावाचा गुत्तेदार बील ही उचलतो तर मग अधिकारी काय झोपा काढतात काय? जलजिवनची पाईप लाईन करण्यासाठी आलेल्या नळ्या सुध्दा त्या सुशांत खवतड नावाच्या गुत्तेदाराने गेली एक वर्षापासुन गायब केल्या आहेत.
केज तालुक्यातील अनेक गावांमध्ये विजय कन्स्ट्रक्शन कंपनीने भोगस कारभार करुन अनेक गावांमध्ये संबंधित गुत्तेदारांनी जलजिवनच्या कामात कोट्यवधी रुपयांचा निधी हडपला आहे. त्याचप्रमाणे बेलगाव मध्ये तर काहीच काम केले नाही अशा भोगस काम करणाऱ्या गुत्तेदाराला तात्काळ काळ्या यादीत टाकले पाहिजे नेमकं बेलगाव येथे जल जीवन चे काम करणाऱ्या या गुत्तेदाराला कोणत्या नेत्याचे अभय आहे. या गुत्तेदाराने जलजीवन च्या नावाखाली कोठ्यावधी रुपयाचा निधी हडप केला आहे. यावर तात्काळ कारवाई झाली पाहिजे. इतक्या कडक उन्हाळ्या मध्ये फक्त अधिकाऱ्यांच्या चुकीमुळे गावाला पाणी पिण्यासाठी नाही सुशांत खवतड नावाच्या गुत्तेदारावर तात्काळ कारवाई करा अशी मागणी बेलगाव मधील नागरिक करीत आहेत.

हर घर जल
जल जीवन मिशन

## चिंचोली माळी बेसुमार अवैध दारू विक्री?

### पोलीस अधीक्षक कॉवत साहेब कार्यवाही केली का जात नाही ?



केज । प्रतिनिधी
केज तालुक्यातील चिंचोली माळी येथे धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज चौक तसेच शासकीय कार्यालयांच्या समोर सुमार अवैध दारू विक्री करण्यात येत आहे तरी सुद्धा चिंचोली माळी येथील अवेध दारू विक्री करणाऱ्या धाब्यावर कार्यवाही केली जात नाही तरी अशा अवैध दारू विक्री करणाऱ्या धाब्यावाल्यांना वरद हस्त कुनाच आहे. पोलीस प्रशासन कार्यवाही करत का नाही असा प्रश्न नागरिकांना पडला आहे.
नेमका अवैध दारू विक्री करण्यासाठी चिंचोली माळीतील धाब्यावाल्यांना अर्शिवाद कुनाचा आहे असा प्रश्न नागरिकांना पडला आहे तसेच काही धाबे शासकीय कार्यालयांच्या समोरच आहेत तरी सुद्धा



प्रशासन गप्प का आहे का शासकीय कार्यालयांच्या समोर दीवसा ढवळ्या अवैध दारू विक्री चिंचोली माळी येथे होत आहे मग काय प्रशासनाने अवैध दारू विक्री करण्यासाठी परवानगी दिली आहे का कारण अशा प्रश्न उपस्थित होतो आहे तसेच चिंचोली माळी येथे दारू पिऊन अनुचित प्रकार घडू लागले आहेत असे प्रकार फक्त दारु पिऊन होऊ लागले आहेत तसेच गावातील अखंड हरिनाम सप्ताह दोन दिवसांनी सुरू होत आहे तरी चिंचोली माळी येथील धाबे राज्यमार्गवर आहेत व येणाऱ्या जाणाऱ्या महीला असतील किंवा शाळेतील लहान मुले असतील यांना रोडवर असणाऱ्या धाब्याचा खुप मोठा त्रास सहन करावा लागत आहे त्यामुळे बीड येथील पोलिस अधीक्षक कॉवत साहेब यांनी चिंचोली माळी येथील अवैध दारू विक्री करणाऱ्या धाब्यावर कार्यवाही करण्यात यावी अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे तसेच चर्चा सत्र नागरिकांन मध्ये सुरू झाले आहे.

## जवळगाव येथील गायरान धारकावर हल्ला करून सरकारला जमिनी धनदांडग्यांच्या घशात घालायच्या का : मानवी हक्क अभियान

केज । प्रतिनिधी
सरकारी गायरान जमिनीवर कष्ट करून गोरगरीब समाज आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. मात्र अशा गोरगरीब जनतेवर हल्ला करून व दडपशाही करून त्या जमिनी वेगवेगळ्या कंपन्यांच्या घशात घालण्याचा डाव महाराष्ट्र शासनाचा असून हा डाव मानवी हक्क अभियान कधीही यशस्वी होऊ देणार नाही.
उत्पन्नाचे कोणतेही साधन नसणारा दलित समाज, वंचित उपेक्षित समाज हा आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्यासाठी शासनाच्या जमिनीवर विविध पिके घेऊन तो आपल्या मुलाबाळांना जगवीत असतो. एकीकडे भरमसाठ जमिनी असणारे धन दांडगे तर दुसरीकडे कुठलीही उत्पन्नाचे साधन नसणारा समाज अशी विषमता या देशांमध्ये आहे, महाराष्ट्र शासन शेतकरी असणाऱ्या घटकाला विविध योजना विविध अनुदान देऊन त्याच शेतकऱ्याचा आर्थिक स्तर उंचावण्याच्या दृष्टीने प्रयत्न करतो. मात्र ज्या समाजाकडे स्वतःची इंचभर ही जमीन नाही आपले कुटुंब जगण्यासाठी दारोदार भटकंती करीत असतो आपले गाव सोडून इतर ठिकाणी कामासाठी गेले तरीही त्या ठिकाणी त्या कुटुंबाला पाहिजे तेवढा मोबदला मिळत नाही म्हणून हा भूमिहीन समाज अत्यंत कठीण परिस्थितीमध्ये जीवन जगत असतो आपल्या कुटुंबाला पोटभर खायला मिळावे मुलाबाळांना व्यवस्थित जगण्यासाठी शासनाच्या गायरान जमिनीवर काही पिके घेऊन मुलाबाळांचे उदरनिर्वाह करतो तरीही अशा समाजाला शासनाकडून कोणतीही मदत मिळत नाही मात्र सरकारी जमीन यावर अतिक्रमण करून आपल्या मुलाबाळांचा उदरनिर्वाह करण्यासाठी तो राष्ट्र दिवस कष्ट करतो. कर्मवीर एकनाथराव आव्हाड यांनी महाराष्ट्र मध्ये गायरान जमिनीची चळवळ उभी करून जी सरकारी जमीन आहे ती आमच्या हक्काची जमीन आहे असा नारा देऊन महाराष्ट्रामध्ये हजारो जमिनी आज भूमिनांच्या ताब्यात आहे व या जमिनीवर तो समाज आपल्या कुटुंबाचे पोट भरतो. आम्ही कोणाच्याही खाजगी जमिनीवर ताबा करीत नसून आम्ही आमचे जमिनीवर ताबा करत असतो. गायरान जमीन भूमिहीनांच्या नावे करण्यासाठी कर्मवीर एकनाथराव आव्हाड यांनी मानवी हक्क अभियान या संघटनेच्या माध्यमातून महाराष्ट्रभर लढा उभा केला. त्यांच्या लढ्यामुळे अनेक वेळेस सरकार ने विविध शासन निर्णय काढले व अनेक गायरान जमीनी कास्तकरांच्या नावे झालेले आहेत तर अनेक जमिनीचे प्रस्ताव प्रशासकीय पातळीवर प्रस्तावित आहेत असे असताना सध्याचे महाराष्ट्र सरकार हे सरकारी जमिनीवर डोळा ठेवून असून या जमिनी विविध खाजगी कंपन्यांच्या घशात घालण्याचा डाव हे सरकार करीत आहे जे भूमीहीन कुटुंब त्या जमिनीवर आपले उदरनिर्वाह करतात अशा घटकावर हल्ला करणे, दडपशाही करून त्या जमिनी काढून घेण्याचा डाव या शासनाचा आहे हा डाव मानवी हक्क अभियान कधीही यशस्वी होऊ देणार नाही, असे प्रतिपादन मानवी हक्क अभियानचे धारूर तालुका अध्यक्ष किसन लोखंडे यांनी केले आहे. यापुढे गायरान जमिनीचा लढा हा खूप तीव्र उभा राहणार असून सर्व गायरान धारकांनी एकजुटीने मानवी हक्क अभियान च्या सोबत येऊन हा लढा देशपातळीवर घेऊन जाण्यासाठी एकत्रित यावे असे आवाहन किसन लोखंडे यांनी केले आहे.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT